# ॥ चिदानंदा उपासना ॥

**ध्यानमंत्र**

पराशक्तीः व्योमधारा शांता अनिरुद्धसमाश्रया। सर्वशक्तिमयी सिद्धा चंद्रकोटी समप्रभा॥

अरुणवर्णा मलातीता पूर्णेन्दुवदनप्रभा। कमलाक्षी कमलालया वरदाभयपाणिका।

नानालंकारभूषणा नंदा अनिरुद्धवल्लभा। त्रिपुरा त्र्यंबका तुर्या नंदादेव्यै नमाम्यहम्॥

**जप:- ॐ श्री आल्हादिन्यै नंदायै संधिन्यै नमो नमः॥**

**जप संख्या २४/५४/१०८**

**नंदामाता तारिणी स्तोत्र**

तू तार नंदे या बालकाला ॥धृ॥

सर्वत दिसती जीवाणु नाना। विषाहारी विषारी मज उमगेना॥ कैसे रहावे घर सापडेना ॥१॥

सुधारू बघावे चूक मागुतीची। भर त्यात पडावी नवीन चुकांची। चुकता चुकता मार्गची हरवला॥२॥

जखमा किती ग अजुनी न भरल्या। मीही कितीतरी जणांसी केल्या। वेदना नुरावी सरकत्या क्षणाला ॥३॥

तू योगमाया परमा अमिता। तू भद्रकाली रमा वत्समाता। तूची गे धारिसी इडा नि पिंगला॥४॥

सूर्य चंद्र असती तुझे दोन्ही नेत्र। आभाळ धरितसे तूजवरीच छत्र। निराधार पृथ्वीस करिसी तू सबळ॥५॥

सुखाचीया काळी जमती आप्त सारे। वेदनेत माझ्या मी एकलाच राही। हृदयीचे शल्य मी सांगू कुणाला॥६॥

तूची गे कमला कमलाक्षी ललिता। तन मन धनाची तू ची गे रक्षीता। भविष्याची काळजी मी वाहू कशाला॥७॥

बाळ मी तुझाची तुझे गुण गातो। तुझीया स्वरांनी सदैव तृप्त होतो। असाची असू दे मी तुझीया चरणाला॥८॥

**वात्सल्य कवच**

ॐ अस्य श्री नंदादेवी स्तोत्र मंत्रस्य समीर ऋषि:। शुभदायिनी श्री नंदा देवता गायत्री अनुष्टुप छंदः। ॐ र्हीं। उं र्हीं। ॐ श्रीं । ॐ नमो नमः।

अथ ध्यानम

गौरी गृहिणी ललिता तारिणी पद्मधारिणी। मंदहास्या विशालाक्षी ल्हादिनी विंध्यवासिनी॥

रक्तांगरागवसनाभरणां विचित्रां ध्यायेत् सुकेशी मंगलकलशहस्तां

क्षेमकरी सिद्धीरुपा त्रायेत् मम जीवनं सौभाग्य सुभगाकारा रक्ष रक्ष विचारधनम्

धर्मशक्ति धर्मामयी रक्ष रक्ष पुण्यसंग्रहम् गुह्योपनिषदुत्तमाशुद्धा त्रायेत मम भविष्यम्

तेजस्विनी तापहारी त्रायेत् मम परिवारं च सुहृदम् ॐ क्रयारुपा करुणारुपा कार्यकारणरूपिणी

ॐ कांचनाक्षी कल्मषघ्नी तृष्णाच्छेदकरी तुला ॐ र्हीं श्रीं क्लीं वद वद नंदिनी स्वाहा

ॐ र्हीं ऐं वं वद वद स्वरनंदा स्वाहा ॐ र्हीं श्रीं नमॊ महाराज्ञी वद वद महाशक्तीः स्वाहा

ॐ नमो नंदायै सर्वसिद्धी प्रदायिन्यै अभिरुपायै स्वाहा ॐ नमो सुनंदायै अतर्क्यगतिप्रदायै

महादारिद्र्य नाशिन्यै स्वाहा ॐ नमो निरानंदायै अनिरुद्धपूजितायै भक्तरक्षणतत्परायै स्वाहा

ॐ नंदे सुनंदे निरानंदे पाहि माम् पाहि माम्